बीड । शनिवार
१२.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : १२
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात चुल पेटवुन गॅस दरवाढीचा शिवसेनेकडून जाहीर निषेध



## भाजप सरकार सामान्य जनतेची लुट करत आहे : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

भाजपशासीत केंद्र सरकारने पन्नास रुपयांनी गॅस दरवाढ करून सामान्य नागरिकांची फसवणुक केली आहे. या दरवाढीचा निषेध म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज बीड च्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात चुल पेटवून महिलांनी भाकरी थापुन शासनाच्या या दरवाढी चा निषेध केला.

निवडणुकी पूर्वी मोठमोठी आश्वासने देऊन सामान्य जनतेची दिशाभूल करून भाजपशासित केंद्र सरकार सत्तेवर आले. सत्तेवर येताच या सरकारने आपले रंग दाखवायला सुरुवात केली. पेट्रोल दरवाढ, जीएसटी वाढ, शेती उत्पादन निर्यात दरवाढ, गॅस दरवाढ करून सामान्य नागरिक, व्यापारी, शेतकऱ्यांची लुट चालु केली असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

ही दरवाढ तात्काळ मागे घेऊन सामान्य महिलांना दिलासा मिळावा म्हणून आजच्या आंदोलनात मोठया प्रमाणात महिलांनी ही सहभाग नोंदवला, निषेध म्हणून चुल मांडून भाकरी थापुन जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी महिला आघाडी च्या जिल्हा संघटक मीराताई नवले, प्रमिलाताई माळी, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, राजेभाऊ माहुवले, आदिनाथ खेडेकर, संजय महाद्वार, तालुका प्रमुख सोपान काका मोरे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, गणेश जाधव, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, मशरूभाई पठाण, सारंग बडे, नय्युम पठाण, गणेश घुंबर्डे, हनुमान काशीद, राजेश कोकणे, अक्षय काशीद सतीश परदेशीं, मुकुंद पाटील, प्रतीक वाघमारे सह शिवसैनिक मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

# बीडमध्ये पैशासाठी मजूर महिलेवर अत्याचार

## महिलेनं केला आत्महत्येचा प्रयत्न, मुकादमाविरोधात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या दिंद्रुडमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ऊस तोडणीसाठी पैशांची उचल घेतलेल्या रकमेतील बाकी देत नाही म्हणून एका विवाहित मजूर महिलेवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. यानंतर याच महिलेचे अश्लील फोटो गावातील ग्रुपवर व्हायरल केले आहेत. यामुळं या महिलेने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, या प्रकरणी मुकादम असलेला अमोल शिनगारेवर गुन्हा



दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुकादम असलेला अमोल शिनगारे हा फरार झाला आहे. या प्रकारणाची पोलिसांनी गंभीर दखल घेत आरोपी शिनगारेच्या अटकेसाठी पथक रवाना करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणाचा तपास दिंद्रुड पोलिस करत आहेत. ऊस तोडणीच्या पैशासाठी मजूर महिलेवर अत्याचार केला आहे.



## दहिफळ येथे कुस्ती आखाड्यात शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी लावली मानाची कुस्ती

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील दहिफळ येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी शबम ीरा यात्रेनिमित्त भव्य कुस्त्यांचा आखाडा भरवण्यात आला होता,बीड जिल्हातुन नामवंत पैलवानांनी या आखाड्यातला हजेरी लावली होती.या भव्य आखाड्यात मानाची व शेवटची कुस्ती शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या हस्ते व शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत लावण्यात आली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# पिंपळनेर येथे श्रीक्षेत्र भगवानगडाचा 91 वा नारळी सप्ताह



**शिरूर । प्रतिनिधी**

श्री संत भगवानबाबा यांनी सुरू केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९१ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे पिंपळनेर (ता. शिरूर, जि.बीड) ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. १०) सप्ताहाचा फुले टाकून प्रारंभ करण्यात आला.

श्री संत भगवानबाबा यांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९१ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांच्यानंतर या सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय

▶▶ उर्वरित पान २ वर

# १५ ग्रामीण बँका बंद होणार; १ मे पासून एका राज्य एकच बँक, नेमके काय आहे प्रकरण?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण बँकेच्या ग्राहकांसाठी मोठी बातमी समोर आली आहे. आता देशातील १५ ग्रामीण बँका बंद होणार आहेत, त्याजागी एक राज्य एक बँक असणार आहे. हा मोठा बदल १ मे पासून लागू होणार आहे.

देशात क्षेत्रीय ग्रामीण बँक अर्थात आरआरबी लागू होणार आहे. ग्रामीण बँकेचे एकत्रीकरण होणार असून हा एकत्रीकरणाचा चौथा टप्पा आहे. त्यामुळे आता एक मे पासून ४३ ग्रामीण बँका




घटून हा आकडा २८ वर येणार आहे. वित्त मंत्रालयाने यासंदर्भात एक अधिसुचना काढली आहे. त्यानुसार, अकरा राज्यातील ग्रामीण बँकांचे एकत्रीकरण होणार आहे. यामध्ये महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, बिहार, गुजरात,

▶▶ उर्वरित पान २ वर

# मानवनिर्मित वणवे निसर्गाच्या जिवावर

## कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी वनप्रेमीची मागणी

**वडवणी । प्रतिनिधी**

शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या डोंगराला सलग तिन दिवस रोज संध्याकाळी आग लागते.या आगीमध्ये दोन ते तीन एकर क्षेत्र असलेल्या डोंगरावरील झाडे, झुडपे जळून खाक झाली आहेत. ही आग नेम की कशामुळे लागली याचे कारण स्पष्ट झालेले नाही.

वडवणी शहराच्या दक्षिण



### मदतीचा अभाव

**डोंगराला आग लागली की वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनीच विझवावी अशी समजूत आहे. खासगी क्षेत्रात लागली तर ज्यांच्या गवताच्या होळ्या आहेत ते लोक आग विझवायला जातात. उर्वरित लोक फक्त आग पाहतात. आग विझवणे ही सामूहिक जबाबदारी आहे ही भावना निर्माण होणे गरजेचे आहे. तरच वणवे रोखण्यात यश येईल.**

बाजूस मोठी डोंगर रांग आहे. या डोंगरावर मोठ्या प्रमाणात झाडी असुन यामध्ये वडवणी पासून २ कि.मी. अंतरावर असणाऱ्या डोंगराला दरवर्षी आग लागण्याची घटना घडत असतात. मंगळवार, बुधवार, गुरुवार रात्रीच्या सुमारास

▶▶ उर्वरित पान २ वर

# श्री क्षेत्र नारायण गड च्या नारळी सप्ताहास प्रारंभ

- ह.भ.प. शिवाजी महाराज व संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती.
- छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व जिजाऊ माँ साहेबांच्या सजीव देखाव्याने मिरवणूक लक्षवेधी.

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखली जाणाऱ्या श्री क्षेत्र संस्थान नारायणगडच्या ७३ व्या नारळी अखंड हरिनाम सप्ताह निमित्त काढण्यात आलेल्या दिंडी प्रदक्षिणा मिरवणुकीस शिरूर कासार पंचक्रोशीतील भाविक भक्तांचा उदंड प्रतिसाद मिळाला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, जिजाऊ मासाहेब व मावळ्यांच्या वेषभूशेतील कलावंत, संबळ वाद्य पथक, नाशिक ढोल पथक, तुतारी पथक, थाळी व भोवरा पथक, टाळ, मृदंग, विना पथक, भजनी मंडळ, वारकरी पथक, भगव्या पताका, झेंडे पथक, तुळशी वृंदावन धारक महिला व कलशधारी महिलांच्या सहभागा मुळे ही मिरवणूक लक्षवेधी ठरली.

श्री संत कुलभूषण महात्मा नगद नारायण महाराज यांच्या कृपेने व वै. ह. भ. प. गुरुवर्य महंत महादेव महाराज यांच्या आशीर्वादाने व ह. भ. प. परमपूज्य महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज

▶▶ उर्वरित पान २ वर



# राजधानी दिल्लीशी डॉ.बाबासाहेबांचे जिव्हाळ्याचे नातं

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील बराच काळ दिल्लीत गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दिल्लीचे एक वेगळे नातेही निर्माण झाले. ब्रिटिश सरकारच्या म्हणजे प्रांतीय मंत्रिमंडळात ते कामगार मंत्री होते त्यामुळे दिल्लीत त्यांचे वास्तव्य असायचे. या काळात ते देशभर फिरत होते. जनतेच्या समस्या जाणून घेत होते आणि मंत्री म्हणून त्यावर निर्णय घेत होते.


दिल्लीत असताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाच्या उभारणीत मोठे योगदान दिले. याच काळात, म्हणजे दिल्लीत असताना त्यांनी देशावर दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेतले. मग ते कामगार कायदे असोत की महिलांच्या अधिकाराचे निर्णय असोत. याच काळात बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र मेहनत करून राज्यघटनेचा मसुदा तयार केला तसेच त्यानंतर हिंदू कोड बिल तयार केले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा दिल्लीत आलेत तेव्हा ते एकटे राहत असत. माता रमाईचे निधन झाल्यानंतर तसे बाबासाहेब खूप दुखावले होते. पण आपल्या प्रकृतीच्या तपासणीसाठी त्यांचे मुंबईला नियमितपणे वैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी जावे लागत असे. तिथेच डॉक्टर मालवणकर यांच्याकडे डॉ सविता कबीर यांची डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली आणि त्यांचे कोर्ट मॅरेज झाले. याच काळात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनेक ग्रंथाचे लिखाण केले. देशाच्या फाळणीवरील त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ त्यांनी दिल्लीतच पूर्ण केला. त्यानंतर त्यांच्या आयुष्यातील शेवटचा जगप्रसिद्ध असलेला ग्रंथ बुद्ध आणि त्यांचा धम्म दिल्लीतच लिहीला. या काळात दिल्लीतील लोकांशी त्यांचे



संबंध आले. हे नाते दृढ होत गेले. उत्तर भारतीयांचा गोतावळा त्यांच्या भोवती असायचा. त्यांना बघायला, ऐकायला, भेटायला लोक सतत येत असत. सुरूवातीला बाबासाहेब यांचे निवास १ हार्डिंग एवेन्यु (गुबंद कोठी) येथे होते. सध्या याला टिळक मार्ग म्हणतात. त्यांचे शेवटचे दिवस सीव्हील लाईन्स येथील २६ अलीपुर रोड येथील कोठीत गेले. भारत सरकारने बाबासाहेब यांच्या स्मरणार्थ या ठीकाणी मोठे स्मारक बांधले आहे. दिल्लीत असताना बरेच लोकांचा त्यांच्या परीचय झाला. हा ऋणाणुबंध वाढला. बाबासाहेबांना बरेच लोक आपले सुख दु:ख सांगत असत. बाबासाहेब यांच्या आऊट कार्टरमध्ये त्यांचे निकटवर्ती सोहनलाल शास्त्री, जे विधी विभागात अधिकारी होते, ते राहत असत. त्यांचा बाबासाहेबांशी जवळीकतेचा स्नेह होता. त्यांच्या जवळचे असलेले चौधरी देवीदास जी यांचे ही बाबासाहेब यांच्या दिल्लीतील घरी येणे जाणे होत असे. चौधरी देवीदास यांचा मुलगा लाला हरीचंद आणि सुन भुरिया देवी यांना २ ऑक्टोबर १९४९ रोजी पुत्र रत्न झाले आणि या बालकाचे नाव गुलाब सिंग असे ठेवण्यात आले. ही आनंदाची बातमी बाबासाहेबांना दयायची होती. त्या दिवशी बाबासाहेब दिल्लीत नव्हते. ते दोन दिवसांसाठी काश्मीर दौऱ्यावर होते. बाबासाहेब काश्मीरहून परत आल्यावर कळाल्यावर चौधरी देवीदास यांनी लाडुचा डबा घेऊन बाबासाहेबांचे घर गाठले. तेव्हा बाबासाहेब त्यांच्या मित्र आणि आप्तांसोबत चर्चेत दंग होते. बाबासाहेबांनी चौधरी देवीदास यांना गेटमधून येताना बघून देवीदास यांचे अभिवादन स्वीकारले. देवीदास हे अंत्यत हर्षामध्ये बाबासाहेबांना सांगू लागले की त्यांना नातु झालेला आहे. मिठाई त्याच्या आनंदात आणली आहे. बाबासाहेबांना मधुमेह असल्यामुळे त्यांनी ती खाल्ली नाही मात्र, सोबत असणाऱ्यांमध्ये वाटून दिली. नातवाचे नाव गुलाब सिंग ठेवण्यात आले असल्याचे चौधरी नी बाबासाहेबांना सांगितले. त्यावर बाबासाहेब यांनी शुभेच्छा देत विचारले, आई आणि बाळ दोघेही बरे आहेत ना. यावर चौधरी यांनी होकारार्थी उत्तर दिले. बाबासाहेब म्हणाले, गुलाब सिंग हे नाव काही बरे वाटत नाही. त्यांनी बाजुला ठेवलेले वर्तमान पत्र उचलले, त्यात शांतीस्वरूप हे नाव वाचले आणि चौधरी यांना सांगितले की आता तुझ्या नातवाचे नाव गुलाब सिंग हे न ठेवता तु शांतीस्वरूप असे ठेव. त्याप्रमाणे चौधरी देवीदास यांनी कागदोपत्री नाव बदलून शांतीस्वरूप हे नाव ठेवले.

पुढे शांतीस्वरूप यांनी भारत सरकारच्या गृह खात्यात नोकरी केली. निवृत्त झाल्यानंतर त्यांनी 'सम्यक' या नावाने प्रकाशन संस्था सुरू केली. उत्तर भारतातील नवोदित लेखकांना त्यांनी संधी दिली. वर्ष २020 मध्ये त्यांचे निधन दिल्ली येथे झाले. आताही त्यांची प्रकाशन संस्था आहे. हयात असेपर्यंत ते सर्वांना मोठया अभिमानाने सांगत, माझे 'शांतीस्वरूप' हे नाव बाबासाहेबांनी ठेवले आहे. अशा अनेक आठवणी बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिल्लीतील आहेत.



प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वच स्तरातील लोकांमध्ये लोकप्रिय होते. आजही राजधानीत त्यांच्या आठवणी संसदेपासून ते दिल्लीतील लोकांमध्ये जाग्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा !

– अंजु निमसरकर–कांबळे
माहिती अधिकारी

पान १ वरून पुढे...

## दहिफळ येथे कुस्ती....

यावेळी मान्यवरांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी बोलताना गणेश वरेकर यांनी सांगितले की, कुस्ती हा खेळ मर्दानी असुन तो जोपासला पाहिजे व शासनानेही याला राजाश्रय दिला पाहिजे, नवयुवकांनी व्यसन न करता कुस्ती व इतर खेळाकडे वळले पाहिजे व आपल जीवन सार्थकी लावले पाहिजे , शिवसेना पैलवानांच्या पाठिशी कायम उभा राहिल असे त्यांनी सांगितले,यावेळी जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके ,किसान सेनेचे भिमराव कुटे , बाळासाहेब काळे,बारिकराव घोडके,अजय जाधव,सय्यद मुजीब , सय्यद शकील ,शेख शकील नवाब ,शेख सिद्दीक अमीर , सय्यद जमील ,शेख नवाब , यांच्यासह परिसरातील व बाहेरील पैलवान व लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपळनेर येथे श्रीक्षेत्र....

उत्तराधिकारी वै.ह.भ.प. गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवले होते. भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती ह.भ.प. महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताहाला महाराष्ट्रातून लाखो भाविकांची उपस्थिती असते.

१० ते १७ एप्रिल हा या महोत्सवाचा कालावधी असून सप्ताहामध्ये दररोज दुपारी ३:३० ते ६ या वेळेमध्ये ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांची श्रीमद् भागवत कथा संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये अनुक्रमे ह.भ.प.महंत कृष्णा महाराज शास्त्री (उत्तराधिकारी भगवानगड), ह. भ. प. प्रभाकर महाराज बोधले (पंढरपूर), ह.भ.प.सोपान महाराज शास्त्री (भागवताचार्य), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर (समाज प्रबोधनकार), ह.भ.प अमृत महाराज जोशी (महामंडलेश्वर), ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगांवकर) यांचे कीर्तन होणार आहे. सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत नामदेव महाराज शास्त्री यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये परंपरेप्रमाणे दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ हे कार्यक्रम होणार आहेत.

पान १ वरून पुढे...

## १५ ग्रामीण बँका...

कर्नाटक, मध्यप्रदेश, जम्मू आणि काश्मीर, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश,राजस्थान आणि ओडीसा या राज्यातील सध्याच्या ग्रामीण बँकांचे विलिनीकरण होणार आहे. एक मे पासून ग्रामीण बँकांची संख्या अठ्ठावीस होणार असून विलिनीकरणानंतर या सर्व बँका एकत्र काम करतील. क्षेत्रीय बँक अधिनियम १९७६ कलम २३ ए (१) नुसार, देण्यात आलेल्या अधिकाराच्या अनुसार विलिनीकरण प्रक्रीया पार पडणार आहे.

कॅनरा बँक, इंडियन बँक, भारतीय स्टेट बँक आणि युनीयन बँक ऑफ इंडियाद्वारे प्रायोजित असलेल्या चैतन्य गोदावरी ग्रामीण बँक, आंध्र प्रगती ग्रामीण बँक, सप्तगिरी ग्रामीण बँक, आंध्रप्रदेश ग्रामीण विकास बँक, आंध्रप्रदेश ग्रामीण बँकेच्या रुपात विलिन केले जाईल.

एक राज्य–एक आरआरबी धोरण– या धोरणाअंतर्गत, देशातील ११ राज्यांमध्ये, प्रत्येक राज्यात फक्त एकच प्रादेशिक ग्रामीण बँक राहील, अशा प्रकारे १५ प्रादेशिक ग्रामीण बँकांचे विलीनीकरण केले जाणार आहे. या बदलांमुळे ग्रामीण भागातील बँकिंग सेवा अधिक सक्षम आणि प्रभावी होतील, असा सरकारचा दावा आहे.

याआधी महाराष्ट्रामध्ये, एक राज्य, एक आरआरबी' धोरणानुसार, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक या दोन बँकांचे विलीनीकरण करण्यात आले आहे. या विलीनीकरणानंतर महाराष्ट्र ग्रामीण बँक म्हणून नवीन बँक स्थापन झाली आहे. या बँकेचे मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर कामगार चौक येथे आहे.

## मानवनिर्मित वणवे...

डोंगराला आग लावण्याचं पाप कोण करत आहे.

डोंगरालाआगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले या मुळे ही आग संपूर्ण डोंगरावर पसरली. यामध्ये विविध झाडे, झुडपे जळून खाक झाले. वन्यप्राण्यांचा या ठिकाणी रहिवास असल्याने यामध्ये वन्यप्राणीही या आगीमध्ये मरण पावल्याची शक्यता नाकारता येत नाही. वनविभागाने अशा घटनांकडे लक्ष द्यावे. त्यांचे लक्ष नसल्यानेच दरवर्षी या डोंगराना आग लागण्याचे घटना घडत असल्याची भावना नागरिकातून व्यक्त होत आहे. ही आग कशामुळे लागली याची चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता असल्याने नागरिकातून बोलले जात आहे.

मार्च ते एप्रिल दरम्यान दररोज कोणत्या ना कोणत्या तरी डोंगराला

पान १ वरून पुढे...

आग लागलेली दिसते. आता तर दररोज एका डोंगराला आग लागलेली दिसते. या आगीत होरपळून मरणाऱ्या सरपटणाऱ्या प्राण्यांची संख्या कागदोपत्री नोंद होत नाही. त्याची दखल घेतली जात नसली तरी कितीतरी मुक्या सरपटणाऱ्या व तृणभक्षी प्राणी, कीटकांचा मृत्यू होतो. त्याचाही विचार करण्याची गरज आहे. वडवणी तालुक्यात डोंगरी भाग आहे. डोंगरांवर मोठ्या प्रमाणात गवत असते. गवत कापून शेतकरी जनावरांसाठी वैरण म्हणून आणतात. पण सर्वच गवत काढले जाते असे नाही. जेवढी गरज आहे तेवढे आणून उर्वरित डोंगरातच होळी रचून ठेवले जाते. हज वाटेने जाताना काहीजण गंमत म्हणून उभ्या गवतावर जाता जाता काडी अथवा ओढलेली बिडी, सिगारेट टाकतात. त्यामुळे आग लागते. हा हा म्हणता शेकडो एकरांतील गवताचा कोळसा होतो. त्यामुळे रानात चरावयास जाणाऱ्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होतो.

### रात्री सात ते सकाळी सात पर्यंत डोंगराला आग

मंगळवारी बुरुजदरा असणाऱ्या डोंगरावर रात्री सात ते सकाळी सात वाजेपर्यंत भीषण आग लागून वणवा पेटला. अशा वणवे पेटवणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करून त्यांना शिक्षा करावी, तरच हे वणवे पेटणे थांबतील, असे मत निसर्गप्रेमी व्यक्त करीत आहेत. परिसरातील डोंगर व माळरानावर लिंब, पिंपळ, हिवुर, करवंदे, बोर, रांजणे अशी अनेक रानमेव्यांची झाडे आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत ही झाडे जळून खाक होत आहेत.

## श्री क्षेत्र नारायण...

(श्रीक्षेत्र संस्थान नारायण गड) यांच्या शुभहस्ते व ह. भ. प. गुरुवर्य महंत संभाजी महाराज (उत्तर अधिकारी श्रीक्षेत्र संस्थान नारायण गड) ह.भ. प. भानुदास महाराज शास्त्री (श्रीराम संस्थान गोमळवाडा) यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे राक्षसभवन तांबा येथील वार्षिक सप्ताहास १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, श्रीक्षेत्र संस्थान नारायण गडचा ७३ व्या नारळी अखंड हरिनाम हरिनाम सप्ताहाच्या आरंभ दिनी, सकाळी १० ते १२ या वेळेत राक्षस भुवन येथील भुवनेश्वर नगर ते सप्ताह स्थळापर्यंत च्या १ किलोमीटर अंतरावर ही भव्य दिव्य दिंडी प्रदक्षिणा मिरवणूक काढण्यात आली होती.

राक्षस भुवन ग्रामस्थांच्या वतीने हेलिपॅड, जगदंबा देवी मंदिर, भुवनेश्वर नगर मार्गे सप्ताह स्थळी निघालेल्या या भव्य दिव्य दिंडी मि

पान १ वरून पुढे...

रवणुकीमध्ये तुतारी, अब्दागिरी, छत्रधारी पथक, थाळी व भोवरा पथक, नाशिकचे सुप्रसिद्ध ढोल पथक, संबळ वाद्य पथक, घोड्यांचे रथ, महिला, पुरुष, युवक, युवती भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्री क्षेत्र नारायण गड संस्थानचे मठाधिपती ह. भ. प. परमपूज्य गुरुवर्य शिवाजी महाराज व संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे नारायण गड येथून राक्षस भवन येथे हेलिकॉप्टरद्वारे सकाळी ठीक १० वाजता आगमन झाले. त्यांच्या शुभ हस्ते राक्षस भुवन येथील जगदंबा देवी मंदिर व अखंड हरिनाम सप्ताह परिसरावर पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर सजविलेल्या रथातून त्यांची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मिरवणूक मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा राक्षस भुवन ग्रामस्थांनी सडा संमार्जन करून आकर्षक रांगोळ्या काढल्या होत्या. ठीक ठिकाणी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. अखंड हरिनाम सप्ताह स्थळावर भव्य दिव्य विठ्ठल रुक्मिणी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, गोमाता मंदिर उभारण्यात आले होते. तेथे ह.भ.प. शिवाजी महाराज यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्तीची विधिवत पूजा, ग्रंथ पूजन व विणा पूजन करण्यात आले. बाळु देवा यांनी या विधीचे पौरोहित्य केले. येथे वै. ह.भ.प. प. पू. गुरुवर्य महंत महादेव महाराज, श्री क्षेत्र नारायण गड संस्थानचे मठाधिपती ह. भ. प. प. पू. गुरुवर्य शिवाजी महाराज, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे रांगोळी चित्र रेखाटण्यात आले होते. त्यानंतर सप्ताह स्थळी उभारण्यात आलेल्या भव्य किर्तन मंडपात त्यांचे आगमन झाले. यावेळी श्री क्षेत्र नारायण गडाचे उत्तराधिकारी संभाजी महाराज, श्रीराम संस्थानचे महंत भानुदास महाराज शास्त्री, श्रीक्षेत्र सुरळे गावचे रंगनाथ महाराज, श्री क्षेत्र दगडवाडीचे मठाधिपती विवेकानंद शास्त्री दिसले महाराज, श्रीरंग डोंगरे महाराज, लाटे महाराज, श्री क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त बळीराम गवते, बी. बी. गीते, महादेव तुपे, गोवर्धन काशिद, किशोर पिंगळे, प्रा. सुशीला मोराळे, राजेंद्र मस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राक्षस भुवन ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित सर्व महाराज मंडळींचे स्वागत व सत्कार करण्यात आला. त्यानंतर ह. भ. प. गुरुवर्य शिवाजी महाराज व संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित भाविक भक्तांना मार्गदर्शन केले. सुधाकर खोले यांनी प्रास्ताविक केले. दादासाहेब खोले यांनी आभार मानले. दिंडी प्रदक्षिणा मिरवणूक यशस्वी करण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह संयोजन समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य, राक्षस भुवन चे ग्रामस्थ व भगवान राऊत यांनी परिश्रम घेतले.

पान ४ वरून पुढे...

## भगवान महावीर...

साहेब यांनी भगवान स्वामीच्या प्रतिमेस अभिवादन करून सर्व समाज बांधवांना भगवान महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. उपरोक्त समारोहाची सांगता श्री. वर्धमान स्थानकवासी, श्वेतंबर जैन स्थानक, महावीर चौक, बीड येथे प्रसिद्ध विचारवंत दादासाहेब मुंडे व ज्येष्ठ लोक पत्रकार भागवतजी तावरे यांनी भगवान महावीर स्वामी यांच्या जीवन चरित्रावर विस्तृतपणे मार्गदर्शन करून सर्व जैन बांधवांना मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी युवा नेते नितीनजी धांडे, भाजपचे शांतीनाथ डोरले, दिगंबर जैन समाजाचे अतुल मौजकर यांनी शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. या प्रसंगी भगवान महावीर जैन कल्याणक समितीचे अध्यक्ष अशोक लोढा यांनी प्रस्ताविक करून समारोहाची सुरूवात केली. प्रारंभी सौ. प्रिती कात्रेला, सौ. सीमा नितीन संचेती, सौ. सीमा चेतन संचेती यांनी नवकार मंत्र सादर केले, भगवान महावीरांचे गुण अनुवाद अनुक्षा बोथरा तथा कन्या मंडळ व डॉ. मनोज ओत्सवाल यानी आपल्या मधुर आवाजात भक्ती गीतांनी केली. आभार प्रदर्शन स्वागत अध्यक्ष जवाहर बोरा यांनी केले. सुत्र संचलन उज्वल कोटेचा या समारोहासाठी प्रकल्प प्रमुख म्हणून मदनजी दुग्गड यांनी अत्यंत सुंदर आयोजन केले. उपस्थितांना गौतम प्रसादी व्यवस्था पारस संचेती यांनी केली. या समारोहासाठी अक्षय बाफना, अल्पसंख्यांक योजना उपाध्यक्ष चतुर्थ झोन ललित आब्बड, महेंद्र दुग्गड, कैलास तातेड, कांतीलाल गेलडा, आशिष संचेती, सचिन करनावट, वर्धमान बेदमुत्ता सुरेश दुग्गड, सुरेश ओत्सवाल, संपत कोटेचा, महावीर बोरा, गणेश नहार, विकास लोढा, चेतन संचेती, हर्षद बाफना यांनी विशेष परिश्रम घेऊन समारोह यशस्वी केला.

पान ४ वरून पुढे...

## अखिल भारतीय भ्रष्टाचार...

सरपंच बापूसाहेब मराडे, भष्टाचार निर्मुलन समिती बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रमेश्वर बप्पा कवचट, राठोड, बालाजी इंगोले , गणेश सुर्वे, बाळासाहेब देवगुडे, पत्रकार,सौ.सीमाताई शिलावंत, सौ.जाधव मॅडम,बंडू आप्पा कोलंगडे,बंडू घोडके, गणेश ढगे,विलास इंगोले, बाळासाहेब भोरे,तसेच मित्र परिवार व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष पदाची धुरा घेतल्यानंतर सारिका पाटील यांनी बीड जिल्ह्यात या संघटनेच्या सभासद नोंदणी करून जास्तीत जास्त महिलांचा यात सहभाग करून या सामाजिक कार्याचे धुरा सांभाळून या संघटनेत महिलांचा जास्त सहभाग घ्यावयास पुढाकार घेणार असून भ्रष्टाचार निर्मूलन विषयी ज्येष्ठ कार्यकर्त्याच्या माध्यमातून त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संघटनेचे चांगल्या पद्धतीने वाटचाल करण्याचा या वेळी आश्वासित केले.

## तलवाडा येथे क्रांतीसुर्य...

कुंड माननीय श्री पत्रकार बापू गाडेकर पत्रकार आर आर आबा पत्रकार सुरेश गांधले पत्रकार अल्ताफ भाई कुरेशी पत्रकार सुभाष शिंदे पत्रकार विष्णू राठोड पत्रकार आर आर आबा पत्रकार तुळशीराम वाघमारे मा श्री दादा रोकडे निखिल करडे संतोष हातागळे रमेश आठवले पत्रकार सुमित करडे माननीय श्री बाबुराव शिंगणे माजी सरपंच हातागळे अरुण डोंगरे ज्ञानेश्वर वादे सोमनाथ काळे प्रकाश भाऊ हात्ते मा श्री गाधले सर मा श्री अशोक आठवले मा श्री अंबादास आठवले अनिल हात्ते अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे विविध पक्षाचे पदाधिकारी अधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

## महात्मा फुले...

यांच्या जीवन कार्याविषयी विचार प्रतीपादन केले. याप्रसंगी बी.ए. हावळे यांनी महात्मा फुले यांनी अंधश्रद्धा, दुष्काळ, रूढी परंपरा, बालहत्या, केशवपन, बालविवाह, पुनर्विवाहाला प्रोत्साहन या संदर्भात जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत कार्य केले. असे विचार प्रतिपादन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू. एस. वाघमारे यांनी केले. याप्रसंगी आर.बी. घुले, श्रीमती एन.जी. मुंडे, शिक्षक सुभाष गायकवाड, शिक्षकेतर कर्मचारी किशोर आवारे आणि सुशील वडमारे, आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी.व्ही. खरसाडे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## जय ज्योती!, जय क्रांती! ...

परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा राज्य सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्यासह प्रमुख पदाधिकारी यांनी वाजत गाजत आणली. यानंतर क्रांतीसुर्य महात्मा फुले यांना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ॲड. सुभाष राऊत यांच्यासह रिपाईचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, नगरसेवक शुभम धूत, जेष्ठ पत्रकार ड. संदीप बेदरे, परीट समाजाचे ज्येष्ठ नेते गणेश जगताप, प्रा. प्रदीप रोडे, बारा बलुतेदार संघटनेचे प्रकाश कानगावकर, राजू ताटे, प्रशांत वासनिक, माजी नगरसेवक नामदेवराव दुधाळ, प्रा. अंकुश निर्मळ, अमर ढोणे, डॉ. संजय तांदळे, श्रीरामनाना ढवळे, रणजीत पाटील, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, रफिक बागवान, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, समता

पान ४ वरून पुढे...

परिषद शहराध्यक्ष निखील शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, दिलीप बेंद्रे, रिपाईचे किसन तांगडे, गौतम चोपडे, अमर विद्यागर, बीड शहर बचाव मंचचे नितीन जायभाये, नवनाथ दोडके, निखील सवाई, रंजित सोन्नर, शेखर पवार, भारत कांबळे, पत्रकार प्रचंड साळुंके, क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, उपाध्यक्ष निलेश राऊत, सचिव अजय काळे, सहसचिव दत्ता राऊत, कोषाध्यक्ष विशाल राऊत, सहकोषाध्यक्ष सुरज राऊत, ऋषिकेश आखाडे, दीपक थोरात, संतोष यादव, ज्ञानेश्वर राऊत, अजय भानुसे, कृष्णा मेत्रे, अमोल राऊत, अभिजीत दहिवाळ, अविनाश शिंदे, अभिजीत मुंडे यांच्यासह फुले, शाहू, आंबेडकर प्रेमी व सर्व समाजातील नागरिक, समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या पहिल्या महिला शाळेचा रथ ठरला मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण!– क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त सायंकाळी सहा वाजण्याचे सुमारास क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक बीड शहरात काढण्यात आली होती. यावेळी डीजेच्या तालावर समता सैनिकांनी चांगलाच ठेका ठरला होता. या मिरवणुकीत सहभागी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम सुरू केलेल्या महिला मुलींच्या शाळेचा चित्ररथ या मिरवणुकीचे खास आकर्षण ठरला.

विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण संपन्न– क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने आयोजित सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या वतीने निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवलेल्या स्पर्धकांचे रोख रक्कम पारितोषिक देऊन त्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### श्रीक्षेत्र ज्योतिबा देवस्थान निपाणी जवळका येथे दोन दिवसीय यात्रा

**गेवराई । प्रतिनिधी**



शनिवार व रविवार या दोन दिवसात भव्य दिव्य अशी यात्रा भरणार आहे, अशी माहिती श्री क्षेत्र ज्योतिबा संस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. अण्णासाहेब लोणकर यांनी दिली. दरम्यान गेल्या वर्षीच्या मोठ्या प्रमाणावर आलेल्या देणगीमुळे मंदिराचे व परिसरातील भव्य दिव्य असे बांधकाम पूर्ण झालेले आहे. दरवर्षीप्रमाणे रितिरिवाजानुसार शनिवारी गंगेवरून पाणी आणून पहाटे पहाटेच देवतेस शाही स्नान, पहिल्या दिवशी बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम, महाराष्ट्रातील आलेल्या देवाच्या काठ्यांचा मिरवणूक कार्यक्रम,भव्य दिव्य छबीना मिरवणूक, आणि शोभेच्या दारूची प्रचंड आतिषबाजी, दुसऱ्या दिवशी रविवारी महाराष्ट्रातील नामांकित कुस्तीपटूचा कुस्तीचा फड असे सर्व कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तसेच श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर जीर्णोद्धाराचा मोठा व्यापक कार्यक्रम हाती घेतला आहे. यासाठी गावातील सर्व तरुण मंडळ यांनी बैठक घेतली व यात्रेच्या ठिकाणी उन्हामधून आलेल्या यात्रेकरूंसाठी मागील वर्षी एक हजार जार च्या पाण्याचे नियोजन केले होते या वर्षी खूपच ऊन खूप पडायला लागले आहे त्यामुळे मागील वर्षी प्रमाणे यावर्षी जास्तीत जास्त ज्यारच्या पाण्याचे नियोजन केले आहे पिण्याच्या स्वच्छ पाण्याचे नियोजन मंदिर परिसरामध्ये उपलब्ध केलेले आहे. सावलीसाठी मंडप उभारणी, दर्शन रांगा, आलेल्या सर्व दुकानदारांचे योग्य नियोजन ज्योतिबांच्या बारा गाड्या ओढण्याच्या कार्यक्रम स्थळीचा परिसर स्वच्छ करणे, कुस्तीच्या फडांचा चोख बंदोबस्त या सर्व विषयावर चर्चा झाली व त्याचे नियोजन करण्यात आले. दरम्यान गेल्या वर्षी प्रमाणेच याही वर्षी होणारी अलोट गर्दी पाहता योग्य ते नियोजन सर्व केलेले आहे. याप्रसंगी रामेश्वर काकडे, दिगंबर लोणकर, मोहन काकडे,मधुकर काकडे, कचरू काकडे, अंगद काकडे, इंजि. अमोल लोणकर,अमोल प्रभाळे, किसन लोणकर, अमोल काकडे, बंडू काकडे, रामप्रभू भापकर, सचिन धुमाळ, प्रमोद धुमाळ, बाळू ढेरे, विशाल लोणकर, किशोर लोणकर, बाळू लोणकर, योगेश काकडे, अशोक काकडे, सचिन वाळकर, संजय काकडे, नितीन लोणकर, किरण लोणकर, सुभाष काकडे, राजाभाऊ गायके, हेमंत लोणकर,भाऊसाहेब काकडे, अशोक लोणकर, विनोद आतकरे , नवनाथ काकडे, रविराज काकडे, यांच्यासह गावातील सर्व मंडळी उपस्थित होते.

### चार कोटी बत्तीस लाख आफु लागवड प्रकरणातील आरोपी रामहारी तिडके यास जामीन मंजुर



**बीड । प्रतिनिधी**

मौजे पिंपरवाडा येथील रामहारी कारभारी तिडके रा. पिंपरवाडा ता. धारुर यांनी त्यांचे शेतात गट नं. ३३ मध्ये आफुची लागवड केल्या प्रकरणात धारुर पोलीस स्टेशन येथील गु.र.नं. ५७/२०२५ अन्वये गुन्हा दाखल झाला. या प्रकरणी पोलीस स्टेशन धारुर यांनी पंचनामा करुन आरोपीस अटक केली होती. सदरील प्रकरणी केज न्यायालयात जामीन अर्ज क्र. ४६/२०२५ यामध्ये दिनांक ०८/०४/२०२५ रोजी मा. साहेबांनी आरोपीचा जामीन मंजुर केलेला आहे. या प्रकरण धारुर, केज तसेच बीड जिल्ह्यातील सर्वांचे लक्ष लागले होते. या प्रकरणात बीड येथील फौजदारी नामांकित वकील अ‍ॅड. बाळासाहेब कोल्हे, अ‍ॅड. प्रभाकर बाबासाहेब आंधळे व अ‍ॅड. संजय उर्फ चंदु जटाळ पाटील पालवनकर यांनी आरोपीच्या वतीने काम पाहिले, त्यांना सहकार्य म्हणुन अ‍ॅड. सुदर्शन मुंडे, अ‍ॅड. गणेश कोल्हे, अ‍ॅड. सचिन केकान, अ‍ॅड. सौ. उषा नामदेव नेहरकर (आंधळे) यांनी केले. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरेंच्या आवाहनाला शिक्षकांचा उदंड प्रतिसाद

**• पुस्तकांमूळे गटसाधन केंद्राला आले वाचनालयाचे स्वरुप**

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी तालुक्याचे कार्यतत्पर व कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त अभिनव सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प करत आपल्या वाढदिवसानिमित्त हारतुरे न करता त्यातूनच भेट म्हणून पुस्तके देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या अनूषंगाने वडवणी तालुक्यातील ७ केंद्रातील सर्व शिक्षक बांधवांच्या वतीने साहेबांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकी केंद्रातून ५४ पुस्तके याप्रमाणे जवळपास ४०० विविध ग्रंथ, कादंबरी व पुस्तके ही त्यांना भेट म्हणून देण्यात आली. दरम्यान ही सर्व पुस्तक व ग्रंथसंपदा गटसाधन केंद्रातच संग्रहीत करुन सर्वांना वाचनासाठी ठेवणार असल्याची प्रतिक्रिया गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी याप्रसंगी व्यक्त केली. दरम्यान या सर्व पुस्तकांमुळे गटसाधन केंद्राला एकप्रकारे वाचनालयाचे स्वरुप प्राप्त झाले होते. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आपल्या उत्कृष्ट कार्यशैलीतून संपूर्ण बीड जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी छाप पाडलेले व कोणत्याही शैक्षणिक उपक्रमात वडवणी तालुका अग्रक्रमी ठेवणारे तालुक्याचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांचा वाढदिवस दिनांक ६ एप्रिल २०२५ रविवार रोजी मोठ्या उत्साहात व अभिनव सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. आपल्या या वाढदिवसानिमित्त कोणीही हारतुरे व इतर अनावश्यक बाबींवर पैसे खर्च न करता याच पैशांचा सदुपयोग व्हावा या उद्देशाने व वाचन जागृती व चळवळीला प्रेरणा मिळावी या हेतूने सर्वांनी ग्रंथ, कादंबरी व पुस्तके याचे आपण वाटप करावे असे आवाहन त्यांनी केले होते. त्यांच्या याच आवाहनाला वडवणी तालुक्यातील सर्व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर व शिक्षक बंधू भगिनी यांनी उदंड प्रतिसाद देत उजगरे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना ग्रंथ, कादंबरी व पुस्तकांची भेट दिली.

# बांधकाम कामगारांच्या नोंदणीच्या नुतनीकरणासाठी लिंबागणेश येथे रास्तारोको आंदोलन

**पंचायत समितीच्या आडमुठेपणामळे नुतनीकरण रखडले : डॉ. गणेश ढवळे**

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड पंचायत समितीच्या एका आदेशाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे नुतनीकरण गेल्या ९ महिन्यांपासून रखडले असुन बांधकाम कामगार (नुतनीकरण) पुन्हा नोंदणी करणे आवश्यक असुन प्रत्येक वर्षी नोंदणी करणे गरजेचे आहे मात्र यासाठी ९० दिवस काम चहा यांची सही घ्यावी लागते. मात्र गटविकास अधिकारी यांच्या आदेशानुसार ग्रामविकास अधिकारी सही देत नाहीत. त्यामुळे शासनाच्या बांधकाम कामगार विकास महामंडळ या योजनेंतर्गत विविध कल्याणकारी योजना जसे की कामगारांच्या मुलांना व कुटुंबियांना मिळणा-या मुला मुलींच्या शिक्षणासाठी

मदत,सामाजिक सुरक्षा, आर्थिक मदत, आरोग्य सुविधा यापासून वंचित असुन शासन स्तरावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आधिका-यांना ग्रामसेवकांना स्वाक्षरी देण्यास आदेशित करून काम गारांची अडचण दुर करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० गुरूवार रोजी अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड , मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागणी करण्यात आली असुन निवेदन मंडळ अधिकारी श्रीधर साळुंके,तलाठी गणपत पोतदार, तलाठी शेख गफुर, पो. हे. संतोष राऊत, नवनाथ मुंढे, मधुकर तांदळे यांनी स्विकारले. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात , रमेश गायकवाड, पांडुरंग वाणी विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, दादा गायकवाड, शेख खाजु,

बांधकाम मिस्त्री सय्यद रफिक, सुधाकर बागल,सय्यद सलीम, सय्यद अकबर, सय्यद आयुब, विलास जाधव, शेषेराव तागड, श्रीराम तागड, भिमराव बोराटे, बंकट लगास, हनुमान अंकुशे, शिवराम गायकवाड, तुकाराम गायकवाड, बन्सी निर्मळ, रामदास निर्मळ, सुधीर क्षीरसागर, सय्यद रियाज, बाळकृष्ण अंकुशे ,बंकट लगास,सय्यद फैय्याज आदी सहभागी होते.

### अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. सदरील जयंती साठी मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड,मंगेश बबनराव जाधव जिल्हा परीविक्षा अधिकारी, संतोष वारे बाल कल्याण समिती सदस्य,बालीका शिंधीकुंमठे शिक्षीका, तौफीक हमीद शेख काळजी वाहक,पौर्णिमा कांबळे,शेख नदीम लतीफ,संतोष शिंदे ,माधुरी शिंदे.आदी उपस्थित होते.

# राजकिशोर मोदी यांच्याकडून जगाला अहिंसेच्या मार्गावर नेणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या प्रतिमेचे पुजन व जैन बांधवास शुभेच्छा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



संपूर्ण जगाला अहिंसेचा संदेशासोबतच अहिंसेच्या मार्ग दाखवणाऱ्या भगवान श्री महावीर यांच्या जयंतीनिमित्त आज अंबाजोगाई शहरात निघालेल्या भगवान श्री महावीर यांच्या भव्यदिव्य अशा मिरवणुकी दरम्यान महावीर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन शहरातील सर्व जैन बांधवांस भगवान श्री महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.या मिरवणुकीत अंबाजोगाई शहरातील सर्व जैन महिला व पुरुष पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की जगाला अशांती व हिंसेच्या प्रवृत्ती पासून दूर नेण्यासाठी भगवान श्री महावीर यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांच्या आई वडीलांचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी ध्यान धारणा व तपस्या प्रारंभ केली. त्यानंतर धर्म व अहिंसा याचा प्रचार जगभर केला. वयाच्या ७२ व्या वर्षी महावीरांचे निधन झाले. जैन बांधव हे भगवान श्री महावीर यांच्या जन्म व निधनाच्या दिवशी घरोघरी दिवे लावतात. भगवान महावीर म्हणतात की, कळत नकळत देखील आपल्या हातून कोणाची हिंसा होणे हे अयोग्य आहे. त्याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये किंवा कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये अशी भगवान श्री महावीरांची शिकवण असल्याचे मोदी यांनी नमूद केले. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये, स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतः प्रत्ति द्वेष वाढवत असतो असेही भगवान श्री महावीरांचे मत होते अशी स्पस्टोक्ती राजकिशोर मोदी यांनी यादरम्यान दिली. सध्या सर्वत्र राजकीय तथा सामाजिक दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा वातावरणात भगवान श्री महावीरांची शांती तथा अहिंसेची शिकवण खऱ्या अर्थाने उपयोगी पडणार असल्याचे परखड मत मोदी यांनी व्यक्त केले.

# माजलगावात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**



क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे आयोजन माजलगावात दि.११ एप्रिल २०२५ रोजी समता परिषद व ओबीसी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकाळी ११ वाजता आमदार प्रकाश दादा सोळंके बहुजन नेते बाबुराव पोटभरे आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले , माजी सभापती कल्याण आबुज,माजी जि प सदस्य शिवप्रसाद खेत्री, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष उमेश मोगरेकर, डॉ.किशोर भोपळे, ओबीसी नेते लक्ष्मण गायकवाड, नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, युवा नेते नवनाथ गायकवाड शिवसेना शहराध्यक्ष धनंजय पापा सोळंके, मराठा महासंघाचे पुरुषोत्तम जाधव सर, काँग्रेसचे नेते नारायण होके पाटील ,युवा सेनेचे अभिजीत कोंबडे, भगवान खेत्रे , भाजपा भटक्या मुक्त आघाडीचे नारायण मेंडके, आझाद क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष अशोक ढगे, ग्रामसेवक गणेश क्षेत्रीय , आदी नी उपस्थित राहुन अभिवादन केले या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने समता परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष चंद्रकांत खेत्री, समता परिषदेचे युवा नेते अनिल हिवरकर, आदी घेतले.

**जाहीर प्रगटन**

**मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश. व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ५४२ / २०२५**

**सोपान किसन ओव्हाळ विरुध्द निरंक**

अर्जदार – १.सोपान पि. किसन ओव्हाळ, वयः ७७ धंदा शेती, रा. लोणीघाट. ता. जि. बीड २. प्रविण पि. सोपान ओव्हाळ, वय ४९, धंदा शेती, रा. लोणीघाट. ता. जि. बीड , ह.मु. तेलुको रस्ता जवळ ३३४ नवीन मस्जीद पुरवज सुपर मार्केट, पुणे शहर , भोसरी, ३.अरविंद पि. सोपान ओव्हाळ, वय: ४४ धंदा शेती, रा. लोणीघाट. ता. जि. बीड, ह. मु. गणेश पान स्टोअर्स जवळ, पावर हाउस जवळ, बालाजीनगरी, भोसरी, पुणे, ४. सगिताबेन भ्र. वाल्मीकभाई आगे, वय: ४८ वर्षे धंदा घरकाम, टी ३९७, प्रेमनगर भेदबाद, पडेसरा सुरत (गुजरात)

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक, **मागणी– वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत सबजान भ्र. सोपान ओव्हाळ,** यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **सबजान भ्र. सोपान ओव्हाळ,** मृत्यु दि. १०/०२/२०१५ रोजी मौजे लोणीघाट, ता जि. बीड येथे झालेले असून अर्जदार हा मुलगा आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे, त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू अर्जदार सदर मयताचे वारस नाही असे कोणाचे सांगणे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवावाया आणि हा मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कोर्ट सदर अर्जदार लागलीच पुरावा घेऊन त्याचा एक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर **मयत सबजान भ्र. सोपान ओव्हाळ,** मौजे लोणीघाट, ता. जि. बर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५/०३/२०२५ माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०५/०४/२०२५ आहे.**

**(मार्फत– अ‍ॅड टी. बी. जाधव )**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

**जाहीर प्रगटन**

बीड जिल्ह्यातील जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार नामे **परमेश्वर कचरु सातपुते** रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड ता. जि. बीड खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतो की, १ ) श्री. किशोर महादेव राऊत, रा. लक्ष्मण नगर, बीड ता. जि. बीड, २) श्री. पांडुरंग नारायण येडे रा. अंजनवती ता. जि. बीड, ३) श्री. सतीश सिध्दराज चित्ते रा. गजानन नगर, नाळवंडी नाका, बीड ता. जि. बीड, ४) श्री. मसु वैजीनाथ लांडे रा. घाटसावळी ता. जि. बीड, ५) श्री. उध्दव रामराव नाईकवाडे रा. चौसाळा ता. जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स. व ता. बीड शहर बीड मोहल्ला बार्शी रोड येथील नवीन वाढीव नगर परिषद हद्दीचे आतील सर्व्हे नं. १०७ तरफ पिंगळे मधील सहन जागा ज्यास शहर भुमापन क्र. ८११२ पैकी असा मिळालेला आहे. ज्यास नगर परिषद बीड वॉर्ड ३ गट ३ मालमत्ता क्र. ३–३–१२२८ असा मिळालेला आहे. जिची लांबी पुर्व – पश्चिम ५५.२२ मीटर व रुंदी दक्षिण उत्तर १८.२९ मीटर आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १०१०.१६ चौ.मी. आहे.

**ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.**

पुर्वेस :– धुळे – सोलापुर राष्ट्रीय महामार्ग क्र. २२

पश्चिमेस :– मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विधी महाविद्यालय यांची शिल्लक जमीन

दक्षिणेस :– मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विधी महाविद्यालय यांची शिल्लक जमीन

उत्तरेस :– श्री. प्रकाश आश्रुबा जोगदंड, श्री. अमोल सुभाष पाबळे, श्री. मदन विठ्ठल जगदाळे व श्री. बाळासाहेब नानाभाऊ शेंडगे यांची जागा

वरील चतु:सिमेअंतर्गत येणारी मिळकत **१ ) श्री. किशोर महादेव राऊत, २) श्री. पांडुरंग नारायण येडे, ३) श्री. सतीश सिध्दराज चित्ते, ४) श्री. मसु वैजीनाथ लांडे, ५) श्री. उध्दव रामराव नाईकवाडे** यांचेकडुन आमचे पक्षकारांनी ईसारपावती दिनांक १५/०१/२०२५ अन्वये वर नमुद मिळकत खरेदी करण्याचा करार केला आहे, सदरील व्यवहारास मध्यस्थी श्री. बबन रघुनाथ जोगदंड रा. वानगाव ता. जि. बीड हे आहेत.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्लॉट मिळकत खरेदीखताबाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार जसे की, तोंडी व्यवहार अथवा लेखी स्वरुपात ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र, दिवाणी व फौजदारी वाद, कर्ज बोजा, वाटणी, हिबानामा, व सदर घर मिळकती मध्ये कोणाचा वडिलोपार्जीत हिस्सा असेल किंवा इतर कोणत्याही स्वरुपाचे कोणतेही व्यवहार अथवा वाद असल्यास ०४ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासोबत खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा.

०४ दिवसात या संदर्भात काही आक्षेप न आल्यास आम्ही सदरील प्लॉट मिळकत निर्विवाद आहे असे समजुन या मळकतीचे रितसर खरेदीखत परमेश्वर कचरु सातपुते यांचे किंवा त्यांचे कुटुंबातील व्यक्तीच्या नावे करुन देण्यात येईल, त्या नंतर कोणतीही तक्रार अथवा आक्षेप मान्य होणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन.

बीड
दिनांक : १०/०४/२०२५

**जाहीर प्रगटन देणार**
**परमेश्वर कचरु सातपुते**
**मो.नं. ९१६८२०८१०१**

**मार्फत**
**अ‍ॅड. संतोष नागरगोजे**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**
**मो.नं. ९२८४०७८०९०**

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र





क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करतांना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, किसन तांगडे, मनोज मस्के, मायाताई मिसळे, प्रभाकर चांदणे भगवान कांडेकर, अक्षय कोकाटे, भैय्यासाहेब मस्के आदी.



बीड: क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा जयंती निमित्त अभिवादन करतांना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, भाई संजय महाद्वार, आजिनाथ खेडेकर, गणेश घुबर्डे, सुशील पिंगळे, तालुका प्रमुख सोपान काका मोरे, रतन तात्या गुजर, गणेश जाधव, नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशी सह आदी .

# वडवणी कडकडीत बंद; बंजारा समाजाची कारवाईची मागणी

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील हरित क्रांती चे प्रणेते वसंतराव नाईक यांचा शहरातील मुख्य रस्त्यावर चौक असुन या चौकाला काही दिवसांपूर्वी एका वाहनाने धडक दिली होती. त्या वेळी कोणताही वाद झाला नाही. ज्यांनी हा प्रकार केला. त्या वाहन चालकाने समाजाची दिलगिरी व्यक्त करत.चौकाची दुरुस्ती करण्याचे मान्य केल्याने प्रकरण शांत झाले होते. याच चौकाच्या दुरुस्ती चे काम सुरू असताना काही अज्ञात व्यक्तींनी येऊन दाबदडप करत हाणामारी केली. काहींना दवाखान्यात दाखल करावे लागले. तर काही समाज बांधव पोलीस स्टेशनम ध्ये तक्रार दाखल करण्यासाठी धावपळ करत होते. हे प्रकरण सुरू असताना संपूर्ण बंजारा समाज संतप्त झाल्याने जखमींना न्याय मिळावा व आरोपींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी दिनांक ११ एप्रिल रोजी शहर बंद ची हाक दिली होती. या बंदला शहरातील तमाम व्यापाऱ्यांनी व सर्वसामान्य व्यवसायीकांनी सहकार्य करत संपुर्ण शहर बंद ठेवण्यात सहकार्य केले. सम स्त बंजारा समाज बांधवांनी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकापासून ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या चौकापर्यंत रॅली काढत घोषणाबाजी केली. आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी काही आंदोलकांनी केली. बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सहायक पोलिस निरीक्षक अमन सिरसट यांच्या नियोजनाखाली चौकाचौकात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.





## थोडक्यात

### महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

श्री नारायण मा. व उच्च माध्यमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली .बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे प्रथम विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मा. महादेवराव काळे आण्णा यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन केले . प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर उपस्थित होते. श्री करपे सर यांनी महात्मा फुले यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.धर्मराज पौळ सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.अशोक घरत सर यांनी केले आभार प्रदर्शन श्री शेख सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक श्री मस्के जी.बी,श्री मुरमुडे ए .एन श्री रकटे पि. आर ,सौ. भुतावळे बि. आर, श्री करपे सर, श्री इनकर बी.जे, श्री रकटे बी. आर,श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी,कदम एस .व्ही, श्री पवार पी .एल, श्री, चव्हाण सर तसेच विद्यार्थी विद्यार्थी, विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवान महावीर स्वामी जन्म कल्याण उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

जगाला अहिंसेचा संदेश देणारे २४ वे तिर्थंकर भगवान महावीर स्वामी यांची २६२४ वा (जन्म दिवस) जन्म कल्याणक म होत्सव अत्यंत हर्षउल्हासात बीड शहरात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भव्य शोभा यात्रा काढून सम ारोहाची सुरूवात करण्यात आली. शोभायात्रेची सुरूवात माजी मंत्री प्रा. सुरेशजी नवले, शिवसेना (उ.बा.टा.) अध्यक्ष उल्हास गिराम भाजप नेते नवनाथ शिराळे, सुशिल पिंगळे, संदिप उबाळे, सतीष परदेशी, दिलीप पवार व सर्व जैन बांधव भारतीय जैन संघटना पदाधिकारी, जीतो युथ पदाधिकारी सुरूवात केली. तसेच बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत




▶▶ उर्वरित पान २ वर



बीड क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा नगर परिषद माजी सभापती मा. नवनाथ आण्णा शिराळे पाटील यांनी भाजपा कार्यालय येथे प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सरपंच सुंदर चव्हाण, राजाभाऊ गवळी, अमोल वडतीले, कपिल सौदा, केशव बडे, अशोक घोलप, नरेश पवार, मच्छिंद्र यादव यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



डॉ. भीमराव पिंगळे विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करतांना शाळेचे मुख्याध्यापक रोहिदास डोंगरदिवे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी.

# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महिला बीड जिल्हा अध्यक्ष पदी सौ.सारिका गायकवाड पाटील यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले यांच्या निवासस्थानी आज व्यापक बैठकीचे आयोजन केले गेले होते, भष्टाचार निर्मुलन समिती चे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.प्रदिप पाटील खडापूरकर बाबा यांच्या आदेशावरून जिल्ह्यातील महिला सक्षमीकरण व महिलांचे विषयी प्रश्न सोडण्यासाठी महिला कार्यकर्त्याची निवड करण्याचे आदेश दिले गेले होते त्यानुसार महिलांच्या धडाडीच्या कार्यकर्त्या जेणेकरून महिलांचे संघटन व महिला विषयी आस्था प्रेम असणाऱ्या सारिका पाटील यांची महिला जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली या वेळी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मा.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव हिंदोळे तसेच मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके मराठा महासंघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष व पौडूळ विद्याम ान ▶▶ उर्वरित पान २ वर



# तलवाडा येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये संपन्न

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने आज तलवाडा नगरमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा आवर्ती पुतळ्यासमोर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साह मध्ये साजरी करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य मा श्री सुरेश हात्ते साहेब प्रमुख पाहुणे मा श्री युवराज डोंगरे व मा श्री माऊली डोंगरे मा श्री सरपंच विष्णू तात्या हात्ते उपसरपंच माननीय श्री आज्जू भाई सौदागर तलवाडा गावचे ग्रामसेवक मा श्री पाटील साहेब मा श्री राजाभाऊ ख्रिस्ते मा श्री गणपत नाटकर सर मा श्री उपसभापती गीताराम डोंगरे मा श्री सामाजिक कार्यकर्ते नजीर भाई कुरेशी मा श्री विजय डोंगरे सर मा श्री बाबासाहेब आठवले मा श्री प्राध्यापक शाम आबा ▶▶ उर्वरित पान २ वर



# महात्मा फुले जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये सत्यशोधक चळवळीचे प्रणेते महान क्रांतिकारक महात्मा ज्योतिराव फुले यांना जयंतीनिमि त्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी ए हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीम ध्ये उत्साह संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रारंभी महात्मा फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन म ान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सुजल भोंडवे कृष्णा हंगे ज्ञानेश्वर सारूक ऋत्विक ढोकणे या विद्यार्थ्यांची आणि यु.बी. पवळ संतोष मेश्राम आणि विजय देशमुख या शिक्षकांनी महात्मा फ ुले ▶▶ उर्वरित पान २ वर



# जय ज्योती!, जय क्रांती! च्या जयघोषाने बीड नगरी दुमदुमली

**क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता रॅली, अभिवादन सभा व स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न**



**माजलगाव । प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाचे आद्य जनक, ज्यांनी पहिली मुली महिलांसाठी शाळा निर्माण करून मुली व महिलांच्या शिक्षणाची द्वारे खुली केली असे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने समता परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अॅड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली. जय ज्योती!.... जय क्रांती!, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो!, राजश्री शाहू महाराजांचा विजय असो!, छत्रपती शिवाजी महाराज की जय!, अण्णाभाऊ साठेंचा विजय असो! अशा गगनभेदी घोषणांनी बीड नगरी दुमदुमून गेली होती.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले सार्वजनिक जयंती महोत्सवानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सकाळी नऊ वाजता समता ज्योत रॅली काढण्यात आली होती. ही समता ज्योत रॅली बीड शहरातील प्रमुख रस्त्यांवरून मार्गक्रमण करीत क्रांतीसुर्य म हात्मा ज्योतिबा फुले पुतळ्यापर्यंत समता ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK